स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**
**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**
**बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६**
**दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in    Email : ropune@dtemaharashtra.gov.in**

जा.क्रः तंशिविकापु/आस्था-३(अ)/ईऑफीस/२०२४/4985    दिनांक : 19 DEC 2024

**परिपत्रक –**

**विषय- ई ऑफिसच्या अंमलबजावणी बाबत..**

संदर्भ– मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.०३/तंशिसं/मा.मुख्यमंत्री बैठक/इतिवृत्त/२०२४/४१, दिनांक १३/१२/२०२४.

उपरोक्त संदर्भाकिंत परिपत्रकान्वये या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय संस्था यांना कळविण्यात येते की, दिनांक ०९ डिसेंबर २०२४ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली प्रशासकीय विभागांच्या सचिवांसमवेत आयोजित बैठकीमध्ये ०१ जानेवारी २०२५ पासून प्रशासकीय विभागांनी सर्व कामकाज ई-ऑफिस प्रणाली व्दारे करण्यात यावा असे निर्देश दिलेले आहे.

तरी सर्व शासकीय संस्थांनी दिनांक ०१ जानेवारी २०२५ पासून सर्व शासकीय पत्रव्यवहार ई-ऑफिस व्दारा करण्यात यावा. सोबत संचालनालयाचे परिपत्रकाची प्रत जोडली आहे.

सदर परिपत्रक आपल्या संस्थेतील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी.

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१९
ई-मेल–desk3@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक : ३/तंशिसं/मा.मुख्यमंत्री बैठक/इतिवृत्त/२०२४/४१

दिनांक : 13/12/2024

विषय : दिनांक ९ डिसेंबर, २०२४ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली प्रशासकीय विभागांच्या सचिवांसमवेत आयोजित बैठकीमध्ये मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने प्रशासकीय विभागांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत...

संदर्भ : शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.४७/र.व का.-१, दिनांक ११ डिसेंबर, २०२४ व सहपत्रे

दिनांक ९ डिसेंबर, २०२४ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली प्रशासकीय विभागांच्या सचिवांसमवेत बैठक आयोजित करण्यांत आली होती. सदर बैठकीमध्ये मा. मुख्यमंत्री महोदयांनी शासकीय कामकाजात ई-ऑफिस द्वारे आणि जास्तीत जास्त ४ स्तरावर मान्यता घेऊन निपटारा करण्याची कार्यवाही करावी. तसेच १ जानेवारी, २०२५ पासून प्रशासकीय विभागांनी सर्व कामकाज ई-ऑफिस प्रणाली द्वारे होईल याची विभागांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश दिलेले आहेत.

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या सदरच्या निर्देशांच्या अनुषंगाने सर्व विभागीय कार्यालये तसेच संचालनालयातील सर्व कार्यासनांच्या कार्यासन अधिकारी यांना कळविण्यांत येते की, दिनांक १ जानेवारी, २०२५ पासून सर्व शासकीय पत्रव्यवहार ई-ऑफिस प्रणाली द्वारेच करण्यांत यावा.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
18 DEC 2024
आवक क्र. 9858

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा., मुंबई

प्रत पुढील कार्यवाहीसाठी :

१) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर. त्यांना कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्थांना उपरोक्त प्रमाणे कळविण्यांत यावे.

२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे, मुंबई

३) कार्यासन अधिकारी, संचालनालयातील सर्व कार्यासने

E:\desk-17\Mali\TEQIP Letter-2024.doc